**Publication: Maharashtra Times**

**Headline: Security in Zaveri Bazaar still remains a question**

**Edition: All Editions - Maharashtra**

**Date: 15th July, 2011**

**Coverage**

# झवेरी बाजारात सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

## व्यापारी संघटना घेणार गृहमंत्र्यांची भेट

**म. टा. व्यापार प्रतिनिधी**

दहशतवाद्यांनी तीनदा झवेरी बाजार परिसराला लक्ष्य करूनही सर्व्हेलन्स यंत्रणा कार्यान्वित करावी, योग्य सुरक्षाव्यवस्था तैनात करावी, पार्किंगला शिस्त असावी, येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांवर नजर ठेवावी, वर्दळीवर अंकुश बसवावा अशा येथील व्यापाऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात सरकारने ठोस पावले उचललेली नाहीत. झवेरी बाजार पुन्हा एकदा बॉम्बस्फोटाने हादरल्याने सरकारने आता तरी या मागण्यांकडे गांभिर्याने पाहावे म्हणून व्यापाऱ्यांच्या विविध संघटनांनी गृहमंत्री आर. आर. पाटील यांची भेट घ्यायचे ठरवले आहे.

झवेरी बाजारातील व्यापाऱ्यांकडे स्वतःची सुरक्षायंत्रणा आहे. परंतु, ती त्यांच्या दुकानापुरती व अंतर्गत सुरक्षेपुरती मर्यादित आहे. आजूबाजूच्या परिसरातील वर्दळीवर लक्ष ठेवण्याइतकी सुसज्ञ व सक्षम यंत्रणा बसवणे एकट्या व्यापाऱ्याच्या क्षमतेबाहेरचे आहे. बाजारात रोज होत असलेले कोट्यवधीचे व्यवहार लक्षात घेता सरकारने अशी यंत्रणा बसवणे आणि त्याचा व्यापाऱ्यांना त्रास होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे असल्याची मागणी व्यापारी करत आहेत.

येथील पार्किंगला शिस्त लावण्याची, फेरीवाले, रस्त्यावर व्यवसाय थाटणारे विक्रेते यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची आहे. यामुळे बाजारातील वर्दळीवर अंकुश बसेल आणि व्यापाराशी संबंधित असलेल्या व्यक्तींचाच वावर तेथे असेल. स्वच्छता मोहीम हाती घेतली जात असली तरी ती तात्पुरत्या स्वरूपाची असते, असे रिद्धी-सिद्धी बुलियन लि.चे एक्झिक्युटिव्ह व्हाइस प्रेसिडेण्ट समीर शाह यांचे म्हणणे आहे.

झवेरी बाजारात रोज अंदाजे २०० ते ३०० कोटी रुपयांची उलाढाल होते. बुलियन मार्केटमध्ये रोज अंदाजे ३५० किलो सोन्याचा व्यवहार होतो. झवेरी बाजार, अब्दुल रहमान स्ट्रीट, क्रॉफर्ड मार्केट अशा लगतच्या परिसराची रोजची उलाढाल ५०० ते हजार कोटी रुपये आहे. या परिसरातून सेल्स टॅक्सच्या मार्फत वर्षाला अंदाजे पाच हजार कोटी रुपयांचा महसूल सरकारी तिजोरीत भरला जातो. त्यामुळे पुन्हा अशा दुर्घटना होऊ नयेत म्हणून वेळोवेळी मागण्या मांडूनही सरकारकडून व्यापाऱ्यांच्या तोंडाला केवळ पाने पुसली जातात, असा आरोप शाह यांनी केला. बॉम्बे बुलियन असोसिएशनच्या सर्व डायरेक्टरची समिती येत्या एक-दोन दिवसात बैठक घेणार असून पुन्हा एकदा या सर्व मागण्या गृहखात्यापुढे मांडल्या जाणार आहेत. त्यासाठी गृहखात्याकडे बैठकीसाठी वेळ मागण्यात आली असून संबंधित संघटना प्रतिसादाच्या प्रतीक्षेत आहेत.

### स्वतंत्र जागेचा प्रस्ताव धूळ खात

हिरे व्यापाऱ्यांसाठी स्वतंत्र 'डायमंड बोर्स'चा प्रस्ताव सन १९९२ मध्ये मांडण्यात आला. प्रत्यक्षात त्याची अमलबजावणी सन २०१० मध्ये झाली आणि वांद्रे-कुर्ला कॅम्पसमध्ये 'डायमंड बोर्स' साकारले. पण ते दक्षिण मुंबईपासून लांब असल्याने, तसेच तेथे सुरक्षेची पुरेशी व्यवस्था नसल्याने व्यापारी तिकडे जायला फारसे उत्सुक नाहीत. सोने व्यापाऱ्यांनाही स्वतःची हक्काची जागा मिळावी, ही मागणी अनेक वर्षांपासून सरकार दरबारी प्रलंबित आहे. बरेचसे व्यापारी दक्षिण मुंबईत राहत असल्याने सुरक्षेच्या आणि सोन्याची ने-आण करण्याच्या दृष्टीने सोयीची जागा मिळावी, असा प्रस्ताव त्यांनी सरकारपुढे ठेवला आहे.